| | |
|---|---|
| MHAU040000622018 | दाखल दिनांक :२०.०१.२०१८<br>नोंदणी दिनांक : २०.०१.२०१८<br>निकाल दिनांक : १३.०३.२०२६<br>कालावधी : व. म. दि.<br>०८ ०१ २४ |

भाग अ

अतिरिक्त सत्र न्यायालय, वैजापुर, जि. औरंगाबाद येथील न्यायालयात
(पिठासिन अधिकारी श्रीमती एस. के. उपाध्याय, यांचे समोर)

विशेष खटला क्र. २/२०१८ निशाणी क्रमांकः

| | |
|---|---|
| गुन्हा क्रमांक व पोलीस ठाणे | ११५/२०१६<br>वैजापुर पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | महाराष्ट्र शासन, मार्फत - पोलीस निरीक्षक, वैजापुर पोलिस स्टेशन, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. |
| उपस्थिती | | सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री के.एस.गंडे |
| आरोपी | | अशोक गणपत झाल्टे, वय - ३२ वर्षे, धंदा - शेती, राहणार- खरवंडी, ता.येवला, जिल्हा नाशिक |
| उपस्थिती | | आरोपींतर्फे विधिज्ञ अमोल म्हसु भुसारे |

विभाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २४.०३.२०१६ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०१.०२.२०१७ |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | ३१.१०.२०१७ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १५.०९.२०२३ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २०.०१.२०२६ |

| | |
|---|---|
| निकाल आरक्षित केल्याचा दिनांक | १०.०३.२०२६ |
| निकाल दिल्याचा दिनांक | १३.०३.२०२६ |
| शिक्षा दिली असल्याच त्याचा दिनांक | -- |

## आरोपीचा तपशिल

| अ. क्रं. | आरोपींची नावे | अटक दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | आरोप ठेवलेले दोषारोप | आरोपीला निर्दोष केले किंवा शिक्षा दिली | कोणती शिक्षा दिली | खटल्याचे दरम्यान अटकेचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अशोक गणपत झाल्टे | ०१.०२.१७ | ०३.०३.१७ | कलम ३६३, ३६६-अ, ३७६(१)(२)(जे)(एन) भा.द.वि व कलम ३(अ)४ पोक्सो कायदा | निर्दोष | -- | -- |

## भाग क

अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

अ. अभियोग पक्ष -

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्रं.१/नि.क्रं. २४ | पिडीता | फिर्यादी (फितुर) |
| सा.क्रं.२/नि.क्रं. २६ | पिडीतेचे वडील | साक्षीदार (फितुर) |
| सा.क्रं.३/नि.क्रं. २९ | सुरेश तुळशीराम सोनवणे | मुख्याध्यापक |
| सा.क्रं.४/नि.क्रं. ३५ | पिडीतेची आई | साक्षीदार (फितुर) |
| नि.क्रं. ५/सा.क्रं.३७ | पो.उप.नि.राहुल तानाजी मोरे | तपासिक अंमलदार |

ब. बचावाचे साक्षीदार

| अ.क्रं. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार , जर असल्यास

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांक

अ . अभियोग पक्ष

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | नि.क्रं.२५/सा.क्रं.१ | पिडीतेचा १६४ सीआरपीसी प्रमाणेचा जवाब |
| २ | नि.क्रं.२७/सा.क्रं.२ | पिडीतेच्या वडीलांच्या जवाबावरील सही |
| ३ | नि. क्रं.३०/सा.क्रं.३ | पिडीतेचा शाळेतील प्रवेश निर्गम उतारा |
| ४ | नि.क्रं.३८/सा.क्र.२ | पिडीतेच्या वडील यांनी दिलेल्या फिर्यादमधील पोर्शन मार्क-अ |
| ५ | नि.क्रं.३९/सा.क्र.२ | पिडीतेच्या वडील यांनी पुरवणी जवाबातील पोर्शन मार्क-अ |
| ६ | नि.क्रं.४०/सा.क्र.४ | पिडीतेची आई यांनी दिलेल्या जवाबातील पोर्शन मार्क-अ |
| ७ | नि.क्रं.४१/सा.क्र.१ | पिडीतेच्या जवाब मधील पोर्शन मार्क-अ |
| ८ | नि.क्रं.४२/सा.क्रं.५ | घटनास्थळाचा नकाशा मिळविण्यासाठी तालुका दंडाधिका-याला दिलेले पत्र |
| ९ | नि.क्रं.४३/सा.क्रं.५ | घटनास्थळाचा नकाशा |
| १० | नि.क्रं.४४ व ४५/सा.क्रं.५ | मुद्देमाल पावत्या |
| ११ | नि.क्रं.४६/सा.क्रं.५ | वैदयकीय अधिकारी यांना जखमीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबतचे पत्र |
| १२ | नि.क्रं.४७/सा.क्रं.५ | आरोपीची वैदयकीय तपासणी होण्याबाबत वैदयकीय अधिकारी यांना दिलेले पत्र |
| १३ | नि.क्रं.४८/सा.क्रं.५ | न्यायीय वैदयशाळा यांना दिलेले पत्र |
| १४ | नि.क्रं.४९/सा.क्रं.५ | पिडीतेचा प्रवेश निर्गम उतारा प्राप्त करण्यासाठी शाळेला दिलेले पत्र |

| | | |
|---|---|---|
| १५ | नि.क्रं.५०/सा.क्रं.५ | पिडीतेचा १६४ सीआरपीसी प्रमाणे जवाब नोंदविण्यासाठी मा.न्यायालयाला दिलेले पत्र |

ब. बचाव पक्षाने मान्य केलेला कागदोपत्री पुरावा

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | नि.क्रं.३१ व ३२ | घटनास्थळाचा पंचनामे |
| २ | नि.क्रं. ३३ व ३३/अ | घरझडती पंचनामे |
| ३ | नि.क्रं. ३४ | आरोपीचा अटक पंचनामा |

क. न्यायालयीन निशाणी क्रमांक

| अ.क्रं | जप्त वस्तु | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. जप्त वस्तु

| अ.क्रं | जप्त वस्तु | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (पारीत दिनांक १३.०३.२०२६)

१. आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३६३, ३६६-अ, ३७६(१)(२)(जे)(एन) व पोक्सो कायदयाचे कलम ३(ब) सहकलम ४ अन्वये अपराध केल्याचे दोषारोप आहेत.

२. अभियोग पक्षाचे कथन प्रथम माहिती अहवाल प्रमाणे संक्षिप्त स्वरुपात पुढीलप्रमाणे :-

पिडीतेचे वडील यांनी फिर्यादी दिली की ते फिर्यादमधील नमुद ठिकाणी त्याच्या पत्नी व मुला व मलीसह राहतात. पिडीता त्यांची मुलगी आहे. घटनेच्या वेळी पिडीता अकरावी वर्गात शिकत होती. परीक्षा झाल्यानंतर पिडीता ही त्यांचे सासरे यांच्या घरी म्हणजे जरुळ येथे गेली होती.

दिनांक २४.०३.२०२६ रोजी त्यांच्या सास-यांनी फोन करुन त्यांना माहिती दिली की, पिडीता ही सायंकाळी सहा वाजेपासुन कोठे गेली हे त्यांना माहिती नाही व पिडीता त्यांच्या घरी आहे का याबाबत विचारणा केली परंतु पिडीतेच्या वडीलांनी पिडीता त्यांच्या घरी आली नाही याबाबत त्यांना सांगीतले. पिडीतेच्या वडीलांनी पिडीतेचा गावात शोध घेतला व नातेवाईकाकडे विचारपुस केली असता तिचा शोध लागला नाही. त्यांना माहिती मिळाली की आरोपीने पिडीतेस पळवुन नेले. पिडीतेचा त्यांनी शोध घेतला असता ती मिळुन आली म्हणुन त्यांनी वैजापुर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

३. उपरोक्त फिर्यादीवरुन अपराध क्र. ११५/२०१६ नोंदविण्यात आला. गुन्हयातील तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक राहुल तानाजी मोरे यांनी केला. त्यांच्या तपासात त्यांनी घटनास्थळ पचंनामा तयार केला, जप्ती पंचनामा तयार केला व जप्त मुद्देमला मोहरील कडे जमा केला, आरोपीस अटक करुन अटक पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले, घटनास्थळाचा नकाशा मिळण्यासाठी तालुका दंडाधिकारी यांना पत्र देवुन तो हस्तगत केला, गुन्हयातील जखमीचे जखमांचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी पत्रव्यवहार करुन जखमीचे प्रमाणपत्र हस्तगत केले, फिर्यादी प्रवेश निर्गम

उतारा मिळण्यासाठी पिडीतेच्या शाळेला पत्र देवुन तो हस्तगत केला, साक्षीदारांचे १६४ सी.आर.पीसी प्रमाणे जवाब नोंदविण्यासाठी न्यायालयास पत्र दिले व तपासाअंती सर्व आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, वैजापूर यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझ्या पुर्वीच्या पीठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द दोषारोप ठेवले. आरोपींनी दोषारोपास कबुली दिली नाही. त्यामुळे त्यांची संपरीक्षा करण्यात आली. सरकार पक्षाने आरोपींचा गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण पाच साक्षीदार तपासले.

५. त्यानंतर आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब घेण्यात आला. आरोपीनी त्यांच्या बचावामध्ये असा बचाव घेतला की, त्यांची जमीन हडपण्यासाठी त्याच्या विरुध्द सदरची खोटी केस दाखल केलेली आहे. आरोपीने बचावार्थ स्वतंत्र पुरावा दिला नाही.

६. <u>अभियोगपक्षाचे युक्तिवाद</u> **:-**

सुविदय सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.गंडे यांनी पुराव्याकडे लक्ष वेधुन यांनी प्रतिपादन केले की, मुख्याध्यापक सा.क्रं.३ यांच्याकडुन अभियोग पक्षाने पिडीता अप्लवयीन असल्याचे सिध्द केले आहे व तपासिक अंमलदार सा.क्र.५ यांचा पुरावा फिर्यादीतील कथनाप्रमाणे असुन एकमेकांशी सुसंगत आहे. त्यांनी साक्षीदारांचे जवाब

सिध्द केले आहेत. तसेच बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामे, जप्ती पंचनामे मान्य केलेले आहेत. त्यामुळे अभियोग पक्षाने दिलेला मौखिक पुरावा एकमेकांशी सुसंगत आहे. म्हणून त्यांनी प्रतिपादन केले की आरोपीला दोषी धरण्यात यावे.

७. <u>बचावपक्षाचा युक्तिवाद</u> **:-**

प्रत्युत्तरार्थ आरोपींचे सुविदय विधिज्ञ भुसारे यांनी प्रतिपादन केले की, अभियोग पक्षाचे महत्वाचे साक्षीदार पिडीता, फिर्यादी व पिडीतेच्या आईने आरोपीविरुध्द काही एक त्याच्या पुराव्यात सांगीतलेले नाही. तसेच त्यांनी प्रतिपादन केले की अभियोग पक्षाचे साक्षीदार फिर्यादी व पिडीता हे अभियोग पक्षास फितूर झालेले असुन अभियोग पक्षाने फिर्याद सिध्द केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. सदर पुराव्यावरुन स्पष्ट होत नाही की आरोपीने पिडीतेचे अपहरण करुन तिच्या समंतीशिवाय वारंवार बलात्कार केला व तिचे लैंगिक शोषण केले हे सिध्द होत नाही. त्यांनी प्रतिपादन केले की, अभियोग पक्षाचे कथन अविश्वसनीय असे आहे व म्हणून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

८. न्यायालयाचे विचारात उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह खालीलप्रमाणे आहेतः-

| अं.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, कथीत घटनेवेळी पिडीत मुलगी ही बालक होती ? | होय |

| | | |
|---|---|---|
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय दिनांक २४.०३.२०१६ रोजी मौजे जेरुळ, ता.वैजापूर, जि. औरंगाबाद, आरोपीने फिर्यादीचे अपहरण करून तिच्या पालकांचे कायदेशीर पालकत्व राखून किंवा प्रलोभन देऊन, उक्त कायदेशीर पालकाच्या संमतीशिवाय तिचे अपहरण करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही |
| ३ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की वरील दिनांक व ठिकाणी तुम्ही आरोपीने पीडितेला तिच्या घरातून अपहरण करुन व तिला तुम्ही आरोपीशी बेकायदेशीर संभोग करण्यास भाग पाडले जाण्याची शक्यता आहे व त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम ३६६-अ अन्वयेचा शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ४ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की दिनांक २४.०३.२०२६ ते ०१.०२.२०१७ या कालावधील दरम्यान आरोपीने पिडीतेच्या संमतीशिवाय वारंवार तिच्यावर बलात्कार करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(१)(२)(जे)(एन) नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ५ | वरील कालावधीत आणि ठिकाणी तुम्ही आरोपीने पीडितेवर लैंगिक अत्याचार केले आणि त्याद्वारे पोक्सो कायद्याच्या कलम ३(अ) सहकलम ४ अंतर्गत दंडनीय गुन्हा केला ? | नाही |
| ६ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>कारणमिमांसा</u>

९. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण पाच साक्षीदार तपासले आहेत.

<u>मुद्दा क्रमांक १</u> -

१०. पिडीता घटनेच्या वेळी अज्ञान होती हे सिध्द करण्याकरीता सरकार पक्षाने पिडीतेला तपासले. पिडीता सा.क्रं.१ हिचे वय सिध्द करण्याबाबत अभियोग पक्षाने सुरेश सोनवणे सा.क्रं.३ यांना तपासले आहे. सदर साक्षीदार पिडीतेच्या शाळेतील मुख्याध्यापक आहेत. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की दिनांक ०१.०७.२००५ रोजी पिडीतेने त्यांच्या शाळेमधे पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतला होता व तशी नोंद १२०६ वर आहे. प्रवेश निर्गम उतारा-याप्रमाणे फिर्यादीची जन्म तारीख २९.१२.१९९८ आहे. आरोपींच्या वकीलांनी त्याचा उलट तपास घेतला असता त्यांनी मान्य केले आहे फिर्यादीचा शाळेत प्रवेश घेत असतांना तो पुर्वीच्या मुख्याध्यापकांनी कशाच्या आधारावर पिडीतेची जन्म तारीख नोंदविली याबाबत त्यांना सांगता येत नाही.

११. सदर निशाणी ३० प्रवेश निर्गम उता-याचे अवलोकन केले असता असे निष्पन्न होत आहे की पिडीतेची जन्मतारीख २९.१२.१९९८ आहे व ती पहिल्या वर्गात प्रवेश घेतांना घेण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रवेश निर्गम उतारा हा पिडीता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेताना दाखविण्यात आली होती. साक्षीदार क्रं.३ यांनी प्रवेश रजिष्टर सादर केले त्यामधे पिडीतेचा प्रवेशाची नोंद क्रं.१२०६ वर दर्शविलेली आहे. त्यामुळे सदर प्रवेश रजिष्टर वरुन व प्रवेश निर्गम उता-यावरुन असे स्पष्ट होत आहे की पिडीतेची जन्म तारीख २९.१२.१९९८ होती. त्यामुळे कलम १२ (३) जे.जे.नियम २००७ मधे उल्लेख केलेला आहे की प्रमाणपत्र पहिल्या शाळेतुन वितरित करण्यात आलेले असल्यास त्या प्रमाणपत्रास मान्यता दिलेली आहे. तसेच कलम ९४ च्या

दरुस्तीचा जे.जे.कायदा २०१५ मधे देखील सदरची बाब नमुद केलेली आहे. त्यामुळे वरील नियमांचे अवलोकन केले असता सदर शाळेने दिलेले प्रवेश निर्गम उतारा हा पिडीतेचा वय निश्चित करण्यास मान्य ठरते तसेच निशाणी ३० चे अवलोकन केले असता घटनेचे वेळी पिडीतेचे वेळ १८ वर्षापेक्षा कमी म्हणजे ती अल्पवयीन असल्याचे दिसुन येते. सबब, घटनेच्या वेळी पिडीता ही अज्ञान होती. म्हणुन मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदविते.

<u>मुद्दा क्रमांक २ ते ५ करीता</u> -

१२. मुद्दे क्रं. २ ते ५ हे एकमेकांवर अवलंबुन व त्यावरील पुरावा निगडीत असल्याने एकत्रीत कारण मिमांसासाठी पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतरित्या विचारार्थ घेतले आहेत.

१३. प्रस्तुतच्या खटल्यात बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामे निशाणी क्रमांक ३१, ३२ तसेच जप्तीचे पंचनामे निशाणी क्रमांक ३३ व ३३/अ प्रमाणे मान्य केले आहेत.

१४. पिडीतेच्या पुराव्यात असे आले आहे की ती तिच्या आई-वडीलासोबत व बहिणभावासोबत राहते. परंतु घटना काय घडली व कोणत्या तारखेला घडली हे तिला सांगता येणार नाही. तसेच तिने सांगीतले की तिच्या जवाबातील अधोरेखाकिंत भाग -अ हा तिने पोलीसांना सांगीतला नव्हता. पिडीतेने तिच्या पुराव्यात कबुल केले की तिचा न्यायालयात जवाब नोंदविला होता परंतु तिला त्यातील मजकुर काही माहिती नसल्याचे

सांगीतले आहे. परंतु तिने तिची फौजदार प्रक्रिंया संहितेचे कलम १६४ च्या जवाबावरील सही निशाणी २५ मान्य केली.

१५. परंतु पिडीता आरोपीने तिचे अपहरण केले, तिला सुरत येथे नेवुन एका भाडयाच्या रुममधे वारंवार तिच्यावर तिच्या समंतीविना बलात्कार केला व नंतर तिच्याशी लग्न केले केली याबाबत काही एक सांगत नाही. त्यामुळे सरकारपक्षाने पिडीतेस फितुर घोषीत करुन तिचा उलटतपास घेतला असता तिच्या सरकार पक्षाने घेतलेल्या उलट तपासात पिडीतेने अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी कोणतीही साक्ष कबुली दिलेली नाही. पिडीतेचा पुरावा अभियोग पक्षास पुष्ठर्थ व पुरक नाही.

१६. अभियोग पक्षाने फिर्यादी/पिडीतेची वडील यांना सा.क्रं. २ व फिर्यादीची आई साक्षीदार क्रं.४ म्हणुन तपासले आहे. परंतु पिडीतेची आईवडीलांनी अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्य करत नसल्याने अभियोग पक्षाने त्यांना फितुर घोषित करुन त्यांना उलटतपास घेतला असता अभियोग पक्षाने घेतलेल्या उलट तपासात अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी कोणतीही साक्ष, कबुली पिडीतेच्या आईवडिलांनी दिलेली नाही. तसेच फिर्यादीने त्याच्या फिर्याद मधील अधोरेखाकिंत भाग-अ व व साक्षीदार क्रं.४ यांनी तिच्या जवाबातील अधोरेखाकिंत भाग-अ पोलीसांना सांगीतलाच नव्हता व तो पोलीसांना का लिहिला याचे कारण त्यांना सांगता येत नाही असे सांगीतले आहे.

१७. वैद्यकीय अधिकारी यांना निशाणी ५३ ते निशाणी ५६ प्रमाणे वेळोवेळी

समन्स काढण्यात आले परंतु त्यांचा नाव पत्ता सापडुन आला नाही. त्यांना एस.पी.मार्फेत देखील समन्स काढण्यात आले परंतु समन्स तामील झाले नाही. म्हणजेच अभियोग पक्षास पुरेशी संधी देवुन देखील त्यांना वैद्यकीय अधिकारी यांना तपासण्यात असमर्थ ठरले. त्यामुळे निशाणी ५७ वर सविस्तर हुकुम करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

१८. अभियोग पक्षाने पोलीस उपनिरीक्षक राहुल तानाजी मोरे-सा.क्रं.४ यांना तपासले आहे. सदरचा साक्षीदार तपासिक अंमलदार असुन त्यांनी ज्या रितीने गुन्हयाचा तपास केला त्याप्रमाणे त्यांनी न्यायालयात जवाब दिला आहे. त्यांच्या पुराव्यामधे त्यांनी त्यांनी तपासामध्ये नियमित तपास करुन, आरोपीस अटक केली, घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, तसेच पिडीतेचे शाळेतून प्रवेश निर्गम उताराची प्रत मिळविली, पिडीतेचे प्रमाणपत्र व कागदोपत्री पुरावा गोळा केला व तपास पुर्ण करुन आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

१९. वरील पुराव्याचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होत आहे की आरोपीने पिडीतेवर तिच्यावर तिच्या समंतीविना वारंवार बलात्कार केला ही बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच सरकारपक्षाचे साक्षीदार व पिडीता हे दोघेही अभियोग पक्षास फितूर झालेले असुन त्यांनी घटनेबाबत काहीही सांगितलेले नाही.

२०. निशाणी क्रमांक ३० वरुन असे दिसते की पिडीता ही घटनेवेळी पिडीता ही अज्ञान होती. परंतु तिने साक्षीमध्ये घटनेबाबत काहीही कथन केलेले नाही. तसेच पिडीता व फिर्यादी यांनी न्यायालयात त्यांचे बयान नोंदविल्याचे सांगितले परंतु त्यातील मजकुर नाकारला आहे. तसेच पिडीतेने व साक्षीदार क्रं. २ व ४ यांनी असेही मान्य केले की त्यांची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे व त्यामुळे तिला सदरचे प्रकरण आरोपीविरुध्द चालवावयाचे नाही.

२१. प्रस्तुतच्या खटल्यामधे पिडीता ही तिच्या पुराव्याच्या विसंगत पुरावा देत आहे. तसेच फिर्यादी कडुन त्याची फिर्याद सिध्द होवु शकली नाही. पिडीता, फिर्यादी व साक्षीदार क्रं.४ हे फितुर झाले असल्याने त्यांचा पुरावा अभियोग पक्षास पुरक ठरलेला नाही. त्यामुळे आरोपीने पिडीतेचे अज्ञान असतांना तिचे अपहरण केले, तिला सुरत येथे नेवुन तेथे नवराबायकोसारखे भाडयाच्या घरात राहुन पिडीतेच्या संमतीविना वारंवार बलात्कार केला व तिचा लैंगिक छळ केला याबाबतचा कोणताही पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर सादर केलेला नाही. तपासिक अंमलदाराने पिडीता, फिर्याद व साक्षीदार क्रं.४ यांच्या जवाबामधील अधोरेखांकित भाग-अ जरी सिध्द केले असले तरी तपासिक अंमलदाराचा पुरावा हा परिपुर्ण पुरावा होवु शकत नाही व त्यांचा पुरावा औपचारिक ठरतो.

२२. अशाप्रकारे कथीत घटनेबाबत कुठलाही परीपुर्ण व ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. म्हणुन असा निष्कर्ष निघतो की, अभियोग पक्ष हे आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करु शकलेले नाही. त्यामुळे आरोपी हा सदर

दोषारोपांतुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मुद्दे क्र. २ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ६ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे-

आदेश

१. आरोपी अशोक गणपत झाल्टे यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३६३, ३६६-अ, ३७६(१)(२)(जे)(एन) व पोक्सो कायदयाचे कलम ३(ब) सहकलम ४ यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये आरोपी यांनी रुपये १५,०००/- चा प्रत्येकी वैयक्तिक जात मुचलका व जामिनदार दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यांत आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUSHMA KARUNESH UPADHYAY
Date: 2026.03.13 17:52:53 +0530

दिनांक - १३.०३.२०२६

(श्रीमती एस. के. उपाध्याय)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
वैजापूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file judgment are same, word to word, as per the original judgment.

Name of the Stenographer : R.V.Kulkarni
Name of the Court : Smt. S. K. Upadhyay, Addl. Sessions Judge,Vaijapur.
Date on which judgment pronounced : 13.03.2026
Date of direct dictation : 13.03.2026
Judgment checked and signed
by the presiding officer on : 13.03.2026
Judgment uploaded on : 13.03.-2026